आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२८ जुलै २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- स्वातंत्र्यदिनानिमित्त हर घर तिरंगा अभियानात सहभागी होण्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं मन की बात मधून देशवासियांना आवाहन

- महाराष्ट्राच्या राज्यपालपदी सी. पी. राधाकृष्णन यांची राष्ट्रपतींकडून नियुक्ती/महाराष्ट्र विधानसभेचे माजी अध्यक्ष हरी भाऊ बागडे राजस्थानच्या राज्यपालपदी नियुक्त

- परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर दोन दिवसांच्या जपान दौऱ्यावर

- पॅरिस ऑलिम्पिकमध्ये १० मीटर एअर रायफल प्रकारात मनू भाकरची आज पदकासाठी लढत

**आणि**

- महिला क्रिकेटमध्ये आशिया चषक टी ट्वेंटी स्पर्धेच्या विजेतेपदासाठी आज भारत आणि श्रीलंका यांच्यात अंतिम सामना

**<><><><><>**

येत्या १५ ऑगस्ट निमित्त हर घर तिरंगा अभियानात सहभागी होत संकेतस्थळावर तिरंग्यासोबतचा फोटो अपलोड करावा, असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना केलं आहे. प्रधानमंत्र्यांनी आज आकाशवाणीवर मन की बात या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधला. हा या कार्यक्रमाचा एकशे बारावा भाग होता. हर घर तिरंगा हे अभियान तिरंग्याचा गौरव करणारा उत्सवच झाला असल्याचं ते म्हणाले.

*****होल्ड - प्रधानमंत्री - हर घर तिरंगा ******

स्वातंत्र्य दिनानिमित्त होणाऱ्या भाषणासाठी दरवर्षीप्रमाणेच यंदाही नागरिकांनी MyGov किंवा NaMo App वर सूचना पाठवण्याचं आवाहनही त्यांनी केलं. यांपैकी जास्तीत जास्त सूचनांचा आपण स्वातंत्र्य दिनाच्या भाषणात समावेश करू असं ते म्हणाले.

नुकत्याच झालेल्या आंतरराष्ट्रीय गणितीय ऑलिम्पियाड स्पर्धेत आजवरची सर्वोत्तम कामगिरी केलेल्या भारतीय विद्यार्थ्यांच्या चमूची कामगिरी त्यांनी देशवासीयांसमोर मांडली. या सगळ्यांनी देशाचा मान वाढवला, देशाचं नाव उज्ज्वल केलं असं म्हणत त्यांनी या कामगिरीची प्रशंसा केली. यावेळी प्रधानमंत्र्यांनी या स्पर्धेतले पदक विजेते पुण्याचे आदित्य वेंकट गणेश आणि सिद्धार्थ चोप्रा, दिल्लीचा अर्जुन गुप्ता, ग्रेटर नॉयडा इथला कणव तलवार, मुंबईचा ऋषील माथुर आणि गुवाहाटीचा आनंदो भादुरी यांच्याशी संवादही साधला.

सध्या ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा सुरू आहे, ही स्पर्धा म्हणजे खेळाडूंना जागतिक पातळीवर तिरंगा फडकवण्याची संधी आहे असं म्हणत, या स्पर्धेत सहभागी झालेल्या भारतीय खेळाडूंना देशवासीयांनी पाठिंबा द्यावा असं आवाहनही त्यांनी केलं.

अंमली पदार्थांविरोधातल्या लढ्यातलं मोठं पाऊल टाकत केंद्र सरकारनं ‘मानस’ हे विशेष केंद्र सुरू केलं आहे. याअंतर्गत समुपदेशन आणि पुनर्वसनाबद्दलच्या माहितीसाठी १-९-३-३ हा टोल फ्री मदत क्रमांकही सुरू केला आहे, अशी माहिती प्रधानमंत्र्यांनी दिली. यावेळी प्रधानमंत्र्यांनी हातमाग आणि इतर

स्थानिक उत्पादनं लोकप्रिय करण्यासाठी देशभरातल्या महिलांच्या प्रयत्नांची माहिती दिली. यात त्यांनी महाराष्ट्राची पैठणी तसंच विदर्भातली हँड ब्लॉक प्रिंट या हातमाग उत्पादनांचाही उल्लेख केला. अशी स्थानिक उत्पादनं लोकप्रिय करण्याच्या प्रयत्नात देशवासीयांनीही स्वतःचा वाटा द्यावा आणि ही उत्पादनं 'हॅशटॅग माय प्रॉडक्ट माय प्राइड' या नावानं समाज माध्यमांवर टाकावीत असं आवाहन त्यांनी केलं.

यंदा खादी ग्रामोद्योगाची उलाढाल पहिल्यांदाच दीड लाख कोटी रुपयांच्या पुढे गेली असून, खादी उत्पादनांच्या विक्रीत ४०० टक्क्याची वाढ झाली असल्याची माहितीही त्यांनी दिली. खादी आणि हातमागाच्या वाढत्या विक्रीनं मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण होत असल्याचं ते म्हणाले.

उद्या जगभरात साजरा होत असलेल्या व्याघ्र दिनानिमित्त मोदी यांनी वाघ आणि मानवी संघर्ष संपुष्टात आणण्यासाठी, तसंच वाघांच्या संरक्षणासाठी देशभरात सुरू असलेल्या प्रयत्नांची माहिती आजच्या मन की बात मधून दिली. याचं उदाहरण म्हणून त्यांनी राज्यातल्या  ताडोबा - अंधारी व्याघ्र प्रकल्पाचाही उल्लेख केला.

प्रधानमंत्र्यांनी यावेळी आसाममधल्या 'चराईदेऊ मैदाम' या ठिकाणाचा युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांमध्ये समावेश झाल्याचं सांगून, नागरिकांनी भविष्यात या ठिकाणांना भेट द्यावी,असं आवाहन त्यांनी केलं.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी विविध राज्यांमध्ये नवीन राज्यपालांची नियुक्ती केली आहे. सध्याचे झारखंडचे राज्यपाल सी. पी.राधाकृष्णन यांची महाराष्ट्राच्या

राज्यपालपदी नियुक्ती केली आहे. तर, महाराष्ट्र विधानसभेचे माजी अध्यक्ष हरी भाऊ बागडे यांची राजस्थानच्या राज्यपालपदी नियुक्ती केली आहे.

तेलंगणात, त्रिपुराचे माजी उपमुख्यमंत्री जिष्णू देव वर्मा यांची, सिक्कीममधे माजी राज्यसभा खासदार ओमप्रकाश माथुर, झारखंडमधे माजी केंद्रीय मंत्री संतोष कुमार गंगवार, छत्तीसगडमधे माजी खासदार रामेन डेका, तर मेघालयात कर्नाटकचे माजी मंत्री सी एच विजय शंकर यांची राज्यपाल म्हणून नियुक्ती केली आहे.

सध्या आसामचे राज्यपाल असलेले गुलाब चंद कटारिया यांची पंजाबचे राज्यपाल आणि केंद्रशासित प्रदेश चंदीगडचे प्रशासक म्हणून नियुक्ती केली आहे. लक्ष्मण प्रसाद आचार्य यांची आसामबरोबरच मणिपूरच्या राज्यपाल पदी नियुक्ती केली आहे. तर माजी आयएएस अधिकारी के. कैलाशनाथ यांची पुद्दूचेरीच्या नायब राज्यपालपदी नियुक्ती केली आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत निवडून आलेल्या सदस्यांचा शपथविधी आज विधानभवनातल्या मध्यवर्ती सभागृहात झाला. विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी नवनिर्वाचित सदस्यांना शपथ दिली. भाजपाच्या पंकजा मुंडे, सदाभाऊ खोत, परिणय फुके, योगेश टिळेकर, अमित गोरखे, शिवसेनेच्या भावना गवळी, कृपाल तुमाने, काँग्रेसच्या प्रज्ञा सातव, राष्ट्रवादी काँग्रेसचे राजेश विटेकर, शिवाजीराव गर्जे, आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे मिलिंद नार्वेकर या सदस्यांनी शपथ घेतली. विधानपरिषदेच्या अकरा जागांसाठी १२ जुलै रोजी मतदान झालं होतं.

**<><><><><>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर दोन दिवसांच्या जपान दौऱ्यासाठी आज सकाळी टोक्यो इथं पोहोचले. जपानमधले भारताचे राजदूत सिबी जॉर्ज यांनी विमानतळावर त्यांचं स्वागत केलं. जयशंकर यांनी एदोगावा इथल्या फ्रीडम प्लाझा इथं महात्मा गांधींच्या पुतळ्याचं अनावरण केलं. गांधीजींचा शांततेचा संदेश आजही तितकाच कालसुसंगत असल्याचं प्रतिपादन जयशंकर यांनी यावेळी बोलताना केलं. जपानचे परराष्ट्र मंत्री योको कामीकावा यांच्या निमंत्रणावरून उद्या होणाऱ्या क्वाड परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीत भाग घेण्यासाठी डॉ. जयशंकर जपानला गेले आहेत. या पार्श्वभूमीवर त्यांनी अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री अँथनी ब्लिंकन यांची भेट घेतली आणि स्थानिक, तसंच जागतिक महत्त्वाच्या विषयांवर चर्चा केली.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या एल्गार परिषद प्रकरणात अटकेत असलेल्या आरोपींचा जामीन मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळला आहे. शोमा सेन, रोना विल्सन, सुधीर ढवळे, महेश राऊत आणि सुरेंद्र गडलिंग यांनी जामिनीसाठी याचिका दाखल केली होती. या सर्वांना २०१८ साली अटक करण्यात आली होती.

**<><><><><>**

दिल्लीच्या ओल्ड राजिंदर नगर भागातल्या एका इमारतीच्या तळघरातल्या नागरी सेवा प्रशिक्षण केंद्रात पाणी भरल्याने काल तीन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला होता. या प्रकरणी दिल्ली पोलिसांनी या प्रशिक्षण केंद्राचा मालक आणि समन्वयकाला ताब्यात घेतलं आहे. मृतांमध्ये दोन मुली आणि एका मुलाचा समावेश असून त्यांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आल्याची माहिती स्थानिक पोलीस उपायुक्त एम. हर्षवर्धन यांनी दिली.

**<><><><><>**

इस्त्रायलच्या ताब्यात असलेल्या गोलन हाइट्स फुटबॉल मैदानावर झालेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यात किमान १२ जणांचा मृत्यू झाला आहे. यामागे इराणचा पाठिंबा असलेल्या हेजबोल्ला या लेबननच्या दहशतवादी संघटनेचा हात असल्याचा आरोप इस्त्रायलनं केला असून या हल्ल्याला चोख प्रत्युत्तर देण्याचा इशारा दिला आहे.

**<><><><><>**

पॅरिस ऑलिम्पिकचा पहिला दिवस भारतीय खेळाडूंनी दमदार खेळ करत गाजवला. महिलांच्या १० मीटर एअर रायफल प्रकारात पात्रता फेरीत मनू भाकर हिनं तिसरं स्थान पटकावत अंतिम फेरीत प्रवेश केला. ही फेरी आज रंगणार आहे. पुरुष हॉकी संघानं ब गटाच्या पहिल्या सामन्यात न्यूझीलंडवर ३-२ अशी मात करून विजयी सलामी दिली. भारताच्या बॅडमिंटनपटूंनीही उत्तम सुरुवात केली. दुहेरीत चिराग शेट्टी आणि सात्विकसाईराज रांकीरेड्डी यांनी, तर एकेरीत लक्ष्य सेन यानं पुढची फेरी गाठली. टेबल टेसिनच्या पुरुष एकेरीच्या प्राथमिक फेरीत हरमीत देसाई यानं जॉर्डनच्या प्रतिस्पर्ध्यावर ४-० असा विजय मिळवला. रोविंगच्या स्कल्स प्रकारात पुरुष एकेरीत बलराज पन्वर यानं चौथं स्थान मिळवून पुढच्या फेरीतलं स्थान नक्की केलं. महिलांच्या मुष्टियुद्ध स्पर्धेत ५४ किलो वजनी गटात प्रीती पवार हिनं पुढच्या फेरीत प्रवेश केला. आज, तिरंदाजी, टेबल टेनिस, जलतरण, नेमबाजी, टेनिस, मुष्टियुद्ध, बॅडमिंटन, रोविंग इत्यादी प्रकारांमध्ये भारताचे क्रीडापटू मैदानात उतरणार आहेत.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमध्ये आशिया चषक टी ट्वेंटी स्पर्धेचा अंतिम सामना आज भारत आणि यजमान श्रीलंका यांच्यात रंगणार आहे. श्रीलंकेतल्या रंगिरी दाम्बुला आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर दुपारी तीन वाजता सामन्याला सुरुवात होणार आहे.

हरमनप्रीत कौर हिच्या नेतृत्वाखालच्या भारतीय संघानं संपूर्ण मालिकेत आपल्या उत्कृष्ट कामगिरीचं प्रदर्शन केलं आहे.

दरम्यान, पुरुष क्रिकेट संघानं तीन सामन्यांच्या टी ट्वेंटी मालिकेत काल झालेल्या पहिल्या सामन्यात श्रीलंकेचा ४३ धावांनी पराभव केला. या मालिकेत भारतानं १-० अशी आघाडी घेतली आहे. या मालिकेतला दुसरा सामना आज संध्याकाळी सात वाजता पल्लेकेले आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर होणार आहे.

**<><><><><>**

मध्य प्रदेश, छत्तीसगड, विदर्भ, कोकण, मध्य महाराष्ट्र आणि गोवा या भागांत काही ठिकाणी मुसळधार पाऊस होईल, असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. तसंच गुजरातला अति मुसळधार पावसाचा रेड अलर्ट आज देण्यात आला आहे. गुजरातच्या सौराष्ट्र, कच्छ या भागांमध्ये तसंच पूर्व राजस्थान, केरळ, माहे आणि कर्नाटकच्या किनारपट्टी या भागात ऑरेंज अलर्ट दिला आहे. येत्या चार दिवसांत देशाच्या पूर्व आणि ईशान्येकडच्या राज्यात विजांच्या कडकडाटासह वादळी वारे आणि हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**